# अहिल्याबाई होळकर: विधवा सक्षमीकरण आणि नेतृत्वाचे प्रतीक

**डॉ. ज्योती सुभाषराव धायगुडे[1]**

**गोषवारा :**

अहिल्याबाई होळकर यांना भारताच्या इतिहासात एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून पाहिले जाते. अहिल्याबाईंनी १८ व्या शतकात विधवापण आणि नेतृत्व यांचा अर्थच नव्याने जगाला दिला. मालवा राज्यामध्ये त्यांनी आपल्या नेतृत्वाने अनेक कल्याणकारी कार्य पार पाडली. या संशोधन लेखामध्ये अहिल्याबाईंच्या नेतृत्वशैलीचा अभ्यास करून त्यांनी पितृसत्ताक समाजात केलेल्या कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. अहिल्याबाई विधवा असूनही नीतिमत्ता, सामाजिक न्याय व लोककल्याणाकरिता आदर्श बनल्या. त्यांचे राज्य हे पारंपारिक मूल्ये आणि प्रगत विचारांचा संगम आहे. आजही महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करताना त्यांच्याकडे प्रेरणास्थान म्हणून पाहिले जाते.

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. जनतेच्या कल्याणासाठी अनेक लोककल्याणकारी कार्य केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा हाच वारसा पुढे नेण्याचे कार्य अहिल्याबाई होळकरांनी अत्यंत समर्थपणे केले. लोकमाता, पुण्यश्लोक, देवी, गंगाजल निर्मल या सगळ्या पदव्या अहिल्याबाई होळकरांना लोकांनी अर्पण केल्या होत्या. मनापासून, हृदयापासून, कुठलाही पदवीदान समारंभ न होता ही, या पदव्या आज दोनशे वर्ष टिकून आहेत, टिकणार आहेत.

**जन्म** :

मन्कोजी शिंदे यांना ३१ मे १७२५ रोजी कन्यारत्न लाभ झाला. महाराष्ट्रातील चौंडी येथे जन्मगाव आहे. त्यांचे वडील एक सर्वसामान्य शेतकरी होते. इतर बालकांप्रमाणे अहिल्याचे बालपण खेळण्यात-बागडण्यात गेले. अहिल्या आध्यात्मिक वृत्तीची होती, तिची महादेवावर मोठी श्रद्धा होती.

**विवाह** :

भारतीय समाजात विवाह हा धार्मिक संस्कार मानला जातो. विवाहासाठी शासनाद्वारे वयाची मर्यादा ठेवण्यात आली आहे. मात्र समाजात सध्याही बालविवाह काही प्रमाणात होताना दिसतात. अहिल्यांचाही बालविवाह झाला होता. १८व्या शतकात त्याकाळी

[1] लोकप्रशासन विभाग , डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

मोठ्या प्रमाणात असे विवाह पार पाडले जात होते. वयाच्या ८व्या वर्षी होळकर वंशामध्ये मल्हारराव होळकर यांच्या पुत्रासोबत (खंडेराव होळकर) यांचा विवाहसोहळा झाला. (श्री पुरुषोत्तम, १९१३) व त्यांच्या वैवाहिक जीवनास सुरुवात झाली.

**वैधव्यप्राप्ती:**

अहिल्याबाईंना वैवाहिक सुख जास्त काळ मिळाले नाही. त्यांच्या वयाच्या २९ व्या वर्षी त्यांना वैधव्य प्राप्त झाले. पतीच्या मृत्यूनंतर त्यांनी ठरविले की आपण सती जावे. पण सासऱ्यांनी त्यांचे मन वळविले व सती जाण्यापासून त्यांना रोखले (विजय जहागीरदार, १९९५). कारण त्यांच्या सासऱ्यांना त्यांचे नेतृत्व कौशल्य माहित होते. माळवा प्रांतात अहिल्यांचे नेतृत्व भविष्याकाळासाठी अपेक्षित कार्य करेल यांची त्यांना खात्री होती व अहिल्याबाईंनी ही तसेच कार्य केले हे खरेच आहे. आपली सून एक अष्टपैलू हिरा आहे हे मल्हाररावांनी ओळखले होते. त्याकाळी विधवांना समाजापासून वेगळं राहण्याची प्रथा असताना अहिल्याबाईंनी समाजजीवन आणि प्रशासन यात सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या राजवटीत (१७६७ - १९९५) न्याय, धर्म आणि दया या तत्त्वावर आधारित शासन झाले. त्या महिलांसाठी प्रेरणास्थान ठरल्या आणि विधवापणाला नवे अर्थ दिले.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

अठराव्या शतकात भारतात सर्वत्र राजकीय अस्थिरता होती. अनेक ठिकाणी प्रादेशिक युद्ध होत होती. मराठा साम्राज्याचा विस्तार होत होता आणि स्थानिक सरदार शासनव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत होते. या काळात होळकर घराण्याने माळवा प्रदेशात आपली ओळख निर्माण केली. १७६६ साली (आपटे द. वि., १८४२) मल्हारराव होळकर यांचे निधन झाले. यानंतर अहिल्याबाईंनी राज्यसत्ता स्वीकारली. त्याकाळी स्त्रियांसाठी हे अत्यंत दुर्मिळ होते. त्यांनी न्याय, समता आणि कल्याण यांवर आधारित शासन केले. त्यांनी धर्मशाळा, मंदिरे, विहिरी आणि शाळा उभारल्या. विशेषतः विधवा अनाथ आणि गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक योजना राबवल्या.

अहिल्याबाईंचे शासन धार्मिक तत्त्वावर आधारित होते पण त्यात आधुनिक प्रशासकीय विचारसरणीचा समावेश होता. त्यांनी प्रजेला सन्मान दिला, स्थानिक स्वराज्यला प्रोत्साहन दिले आणि सर्व स्तरावर न्याय दिला.

**अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्वगुण :**

अहिल्याबाईंचे नेतृत्व हे करुणा, नीतिमत्ता आणि दूरदृष्टी यावर आधारित होते. वैयक्तिक दुःख असूनही त्यांनी प्रजेचा विचार प्रथम केला.

**प्रशासकीय सुधारणा :**

मानवी आचार, विचार, प्रथा, पर्यावरण तसेच वातावरण यामध्ये कालांतराने बदल होत असतात. या बदलत्या परिस्थितीतील कायदा, नियम यामध्येही परिवर्तन करणे गरजेचे असते. प्रशासकीय अर्थाने याला प्रशासकीय सुधारणा म्हणतात. प्रशासनामध्ये स्थिरता आणि परिवर्तन या दोघांमध्ये समतोल साधण्याचा सुधारणांचा हेतू असतो. यामध्ये संस्थेचे स्वरूप नव्हे तर मानवी

व्यवहारामध्ये बदल आणि व्यक्तीची मूल्यविषयक धारणा बदलणे हाच परिवर्तनाचा मुख्य गाभा असतो (Mohit Bhattacharya, 2013). परिवर्तनाची प्रक्रिया मोठी असते, व हे बदल टप्प्या-टप्प्याने उत्क्रांतीवादी पद्धतीने होतात.

**अहिल्याबाई होळकर : विधवा सक्षमीकरण आणि नेतृत्वाचे प्रतीक**

महिला सक्षमीकरण, सबलीकरण व सक्षमीकरण हे समान अर्थाने शब्द प्रचलित आहेत. अहिल्याबाईंच्या हातात जेव्हा राज्याची सूत्रे आली, तेव्हा त्यांचे सासरे त्यांच्या पाठीमागे उभे होते. कारण अहिल्याबाईंचे कर्तृत्व त्यांना माहिती होते. अहिल्याबाईंनी स्वतःला कधीही दुर्बल समजले नाही ती स्वतःसाठी कधी जगलीच नाही. प्रजासुख हे तिच्यासाठी सर्वस्व होते. तिला स्वतःला जशी बळ (शक्ती) मिळाली होती तशाच प्रकारे समाजातील दुर्बल महिलांनाही अधिकार मिळावेत यासाठी तिने अनेक कार्ये केली आहेत. अहिल्याबाईंचे नेतृत्व पाहण्यासाठी तिने राज्यकारभार चालविताना जो दृष्टिकोन समोर ठेवला होता, त्याचा अभ्यास केल्यानंतर खरेच ती विधवा सक्षमीकरण व नेतृत्वाचे प्रतीक होती याची प्रचिती येते.

**राजकीय दृष्टीकोन :**

महाराष्ट्रामध्ये राजमाता जिजाबाई व कोल्हापूरची राणी ताराबाई नंतर मराठी राज्याची धुरा समर्थपणे पेलल्यासाठी अहिल्याबाईंचा उल्लेख करावाच लागेल. अहिल्याबाईंनी राज्यकारभार करत असताना पेशव्यांना जी पत्रांची उत्तरे दिली, त्यावरून त्यांचा मुत्सद्दीपणा व राजकीय दूरदृष्टी व त्यांच्या चातुर्याची साक्ष ठळकपणे दिसून येतात. अहिल्याबाईंनी आपल्या राजकीय कारकिर्दीत कधी परप्रांतावर आपण आक्रमण करून त्यांच्यावर राज्य करावे असा ध्यास घेतला नव्हता. त्यांची वृत्ती साहसी होती व सत्यप्रियता व अन्यायाची चीड यामुळे प्रजेचा विश्वास त्यांनी सहज संपादन केला होता. अहिल्याबाईंना माणसाची पारख होती. राज्यकारभार करीत असताना आपण नेमनार असलेली व्यक्ती त्या कार्यासाठी पात्र असेल अशा व्यक्तीची ते निवड करीत असे व ती निवड योग्य ठरत होती. आप्तइष्टांना न नेमता त्या कर्तव्यगार व बुद्धिमान व्यक्तीची निवड करत असत (ठाकूर, १९४४). राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या बाबी त्या स्वतःकडे राखून ठेवत असत. युद्धांच्या बाबत तह, करार, परराष्ट्रांशी संबंध किंवा व्यवहार इ. कार्य त्या स्वतः पाहत असत. पुणे, हैद्राबाद, श्रीरंगपट्टण, नागपूर, लखनऊ, कलकत्ता या प्रमुख ठिकाणी होळकरांतर्फे जे वकील नेमले जात, त्यांची नेमणूक अहिल्याबाई करत असत. करवसुलीची निवड पद्धत त्यांनी सुरू केली. प्रजेकडून उत्पन्नाचा चौथा हिस्सा त्या कर म्हणून घेत असत. गनिमी काव्याच्या युद्ध पद्धतीचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. युद्धविषयक शास्त्रामध्ये त्या तज्ज्ञ होत्या. अहिल्याबाईंच्या ठायी युद्धकलेचे कौशल्य व उच्चकोटीचा राजकीय दृष्टीकोन होता. त्यामुळे लोककल्याणकारी कार्य त्या सहजपणे पार पाडू शकत होत्या.

**सामाजिक दृष्टीकोन :**

अहिल्याबाईंनी आपली प्रजा सुखी राहण्यासाठी काय करता येईल, याकडे त्यांचे लक्ष होते. अहिल्याबाई आध्यात्मिक होत्या. समाजामध्ये प्रजेचे खरे प्रश्न काय आहेत हे त्या जाणत होत्या व सक्षम त्या राज्यकर्त्या होत्या. त्यामुळे यशस्वी सुवर्णमध्य साधून समाजासाठी एक नवा आदर्श निर्माण केला. भारतातील विविध राज्यांमध्ये त्यांनी जी विविध धार्मिक कार्ये केली त्यामधून न्यायदान

व सामाजिक कर्तव्यांची जाण हे आपणास दिसून येते. प्रजेच्या सुखात आपले सुख आहे, असे त्या मानत. लोकपयोगी कार्य पार पाडत असताना कारागिरांना विशेष प्रशिक्षण देण्याबाबत त्या इच्छुक होत्या (माने बी. के., १९९७). असे प्रशिक्षण कारागिरांना दिले गेले. महिलांना कपडे धुण्यासाठी नदीवर जावे लागते पण नदीकिनारी असलेल्या चिखलामुळे महिलांना कार्य करताना अडचणी येत होत्या, तेव्हा नदीवर घाट बांधावे ही कल्पना अहिल्याबाईंना आली. हे कार्य पूर्णत्वासाठी महिला वर्गाची ही त्यांनी चर्चा केली होती. पेशवे काळात स्त्रियांचा दर्जा हा खालावलेला होता, विधवेचा दर्जा तर खूपच खालावलेला होता. स्वतः विधवा असल्यामुळे विधवेचे दुःख अहिल्याबाईंना माहिती होते. एका विधवा स्त्रीला त्यांनी सारोटी सोमनाथ येथून मंदिर बांधण्याच्या कार्यासाठी नेमले होते. विधवा स्त्रिया सक्षम होणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते (दीक्षित म., १९८४). सरकारी खजिना कमी झाला तरी चालेल पण सर्वसामान्य जनतेच्या घरात धनलक्ष्मीचा वर्षाव कसा होईल याकडे त्यांचे लक्ष होते. प्रजेच्या रक्षणासाठी त्या तत्पर होत्या. निमोडमध्ये भिल्लांनी जनतेला मोठा त्रास देत होते, तेव्हा त्यांच्या बंदोबस्तासाठी अहिल्याबाईंनी कसोशीने प्रयत्न केले. त्यांनी यशवंतराव या तरुणाला या बंदोबस्ताची जबाबदारी दिली. ही जबाबदारी यशस्वी झाल्यानंतर आपल्या मुलीचा विवाह त्या तरुणासोबत करून दिला. या प्रसंगावरून असे लक्षात येते की जात-पात त्या मानत नव्हत्या, फक्त त्या जात शुरांची व घराणे पराक्रमाचे एवढेच त्या पाहत होत्या. यावरून समाजसुधारणावादी दृष्टीकोन लक्षात येतो. आपल्या राजदरबारामध्ये एखादा कर्मचारी आजारी असेल तर त्या स्वतः त्यांची विचारपूस करत असे. हे फक्त राजदरबारापुरते मर्यादित नव्हते तर गावातील व्यक्ती सुद्धा अहिल्याबाईंना आपले दुखणे सांगत होत्या, त्या सुद्धा मायेने त्यांची विचारपूस करून असे. यावरून प्रजा व त्यांच्यामध्ये माता-पुत्राचा व्यवहार होता हे लक्षात येते. महेश्वर येथे त्यांनी वस्त्रोद्योगाला चालना दिली. यामुळे स्त्री-पुरुष दोघांनाही रोजगार मिळाला. आजही माहेश्वरी साड्या सर्व भारतात प्रसिद्ध आहेत. अहिल्याबाईंनी २८ वर्षे राज्य केले. या राज्यकारभारात त्यांनी दाखवून दिले की विधवा स्त्रीही प्रगतशील राज्य उभे करू शकते.

**धार्मिक दृष्टिकोन :**

आधुनिक भारताच्या इतिहासात अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाला तोड नाही. एक बालविधवा असूनही त्यांनी होळकरांचा राज्यकारभार सुवर्णाक्षरांनी लिहावा असे त्यांनी कार्य केले आहे. मुस्लिम आक्रमणांमुळे जी मंदिरे पाडण्यात आली होती, त्यांची परत उभारणी करून मंदिरांची नित्यक्रम त्यांनी सुरु केले. अहिल्याबाईंना हिंदू धर्माविषयी अपार प्रेम होते व अहिल्याबाई होळकरांची शंकरावर भक्ती खूप होती. त्यामुळे अनेक ठिकाणी त्यांनी संबंध भारतातील अनेक शिवमंदिरांचा जीर्णोद्धार केलेला दिसून येतो. (लेले सुमती, २००९) आपल्या राज्यामध्ये प्रत्येकाला त्यांच्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी प्रजेला दिले होते. सर्व धार्मिक स्थळांना ज्या देणग्या पूर्वापार चालत होत्या त्यामध्ये त्यांनी कधीही खंड पडू दिला नाही. आपल्या एकछत्री अठ्ठावीस वर्षांच्या कालखंडात मुस्लिम राजे जे हिंदू विरोधी होते तेही अहिल्याबाईंच्या धार्मिकतेने भारावून गेले होते. (शास्त्री अवधूत, १९७५) यामध्ये हैदर, टिपू सुलतान, निजाम, अयोध्येचा नवाब इत्यादी राजे सांगता येतात. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की अहिल्याबाईंचे धार्मिक कार्य हे समाजकारणाशीच जोडलेले होती. कारण त्यांच्या कार्यामुळे अनेक कामगारांच्या हातांना काम मिळाले होते व शिल्पकारांना कलेला वाढविता आले. थोडक्यात रोजगाराच्या अनेक संधी त्यांनी उपलब्ध केल्या. आधुनिक काळात सरकारद्वारे रोजगार हमी योजना राबविली जाते, तशाच प्रकारे त्यांनी अनेक बांधकामे सुरू करून लोकांच्या उपजिविकेचे प्रश्न सोडविले होते.

**शैक्षणिक दृष्टीकोन:**

स्त्रीने शिक्षण घेतले तर संपूर्ण कुटुंबच साक्षर होते म्हणूनच प्रगतीकडे ते कुटुंब जाते. जर राज्य चालविणारी राणी (राजा) जर सुशिक्षित असेल तर राज्यांचा कारभार सर्वोच्च शिखरावर जाण्यास कोणीही थांबू शकणार नाही. अहिल्याबाईंना लिहिता-वाचता येत होते. मोडी लिपीही तिला येत होती. विशेष म्हणजे आध्यात्मिक कथा, प्रवचन व कीर्तन ऐकण्याची त्यांना सवय होती. यामधूनच लोककल्याणकारी कार्य करण्याची त्यांना प्रेरणा मिळाली होती (पाटील सुलोचना, १९७५). अहिल्याबाईंना वाचनाचे महत्त्व पटलेले होते. त्यांनी अनेक ग्रंथ लोकांना वाचता यावेत म्हणून पुस्तकांचे दान मोठ्या प्रमाणात केले. आपल्या राजधानीच्या ठिकाणी महेश्वर येथे वेदाभ्यासाच्या व संस्कृतच्या शाळा काढल्या होत्या. समाजाचे प्रबोधन व्हावे म्हणून पुराणांचे वाचन, प्रवचन, भागवत कथा, सप्ताह व धार्मिक उत्सव साजरे करण्यावर त्यांनी भर दिला होता. आपल्या राजदरबारात अनेक शाहीर विद्वानांना व कवींना राजाश्रय दिला होता व त्यांच्यामार्फत अनेक ग्रंथांचे लिखाण झाले होते. प्रजेची दृष्टी व्यापक व्हावी हा अहिल्याबाईंचा उद्देश होता.

**पर्यावरणविषयक दृष्टीकोन :**

भारत सरकारने अन्नसुरक्षा कायदा २०१३ साली निर्माण केला. यामागचा उद्देश लोकांना पोटभर अन्न उपलब्ध व्हावे हा आहे. असाच दृष्टीकोन अहिल्याबाई होळकरांचा होता. त्यांनी आपल्या राज्यात उभी पिके विकत घेतली होती. आपल्या राज्यातील मुंगी सुद्धा उपाशी राहू नये असे त्यांचे मत होते. गाई-गुरांसाठी कुरणांची व्यवस्था त्यांनी केली होती. जंगलातील प्राण्यांसाठी पाण्याची सोय व्हावी यासाठी तलावांची निर्मिती केली. ते तलाव आजही अस्तित्वात आहेत. आपल्या राज्यात पशू-पक्ष्यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र खाते निर्माण केले होते यासाठी स्वतंत्र नोकरवर्गाची भरती ही करण्यात आली होती. प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात २० झाडे लावावी असे सांगण्यात आले होते. यामागचा उद्देश म्हणजे पावसाचे प्रमाण वाढण्यासाठी हे गरजेचे असते. डोंगराळ भागात वृक्षारोपण करण्याचे कार्य केले जात होते. यामुळे डोंगराळ प्रदेशातील लोकांना रोजगार मिळत होता. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ज्या विविध योजना, कार्यक्रम, उपक्रम व धोरणे आधुनिक सरकारद्वारे तयार केले जातात, अशाच प्रकारचे कार्य त्यांनी २५० वर्षांपूर्वी केले. थोडक्यात सांगता येईल की राज्यकारभाराची दूरदृष्टी त्यांच्याकडे होती (महाशब्दे दीपककुमार, १९८२). त्यांनी त्या काळात जी कार्ये केलेली आहेत, त्यांची फळे आतापर्यंत जनतेच्या हातात पडत आहेत.

**सांस्कृतिक दृष्टीकोन :**

अहिल्याबाईंना कलेची जाण होती. व्यक्तीच्या अंगात काहीतरी कलागुण असतात, त्या मतांच्या त्या होत्या. त्यामुळे कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच सांस्कृतिक ठेवणीची जपणूक व्हावी म्हणून त्यांनी स्थापत्य, चित्रकला कलेला प्रोत्साहन दिले. भारतातील अनेक प्रसिद्ध मंदिरे यांचा जीर्णोद्धार गोदावरी, नर्मदा व गंगा नदीवरील घाट, धर्मशाळा, तलाव, विहिरी, रस्ते व मार्गद्वार इ. निर्मिती अहिल्याबाईंच्या कालखंडात विशेषत्वाने झालेली दिसून येते. अहिल्याबाईंच्या काळात अनेक नवीन मूर्त्या तयार करण्यात आल्या त्यामध्ये विशेष करून सांगता येईल मल्हारी मार्तंड व म्हाळसाकांत खंडोबांची मूर्ती डोळ्यात भरणारी तयार करण्यात आली. त्याकाळातील वेशभूषा आणि राहणीमानाचा अभ्यास करावयाचा असेल तर चित्रकलेच्या माध्यमातून सविस्तरपणे करता येतो.

**पाणीटंचाईबाबत दृष्टीकोन :**

आधुनिक काळात ज्या पाणीटंचाईच्या झळा जनतेला बसतात, तशाच झळा होळकरांच्या कारकिर्दीत बसू नये म्हणून अनेक ठिकाणी पायऱ्या असलेल्या विहिरी बांधण्यात आल्या. नाशिक जिल्ह्यातील चांदवड हे अहिल्याबाईंच्या वास्तव्याचे ठिकाण होते. त्या ठिकाणच्या विहिरी आजही पाणीटंचाईवर मात करण्यासाठी वरदान ठरल्या आहेत. या विहिरीचे वैशिष्ट्य म्हणजे गंभीर पाणीटंचाई असली तरी या विहिरीचे पाणी आटत नाही तसेच हत्तीसुद्धा या विहिरीतून पाणी बाहेर काढू शकतील एवढा मोठा व्यास या विहिरीचा आहे. सध्या चांदवड तालुक्यातील अनेक गावांना टँकरने पाणी देण्यासाठी या विहिरीचा उपयोग केला जातो.

अहिल्याबाई होळकरांच्या अंगी राज्यकारभार करण्यासाठी परिपूर्णपणे पात्रता होती. आपले राज्य सुजलाम-सुफलाम होण्यासाठी धार्मिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणविषयक, सांस्कृतिक तसेच पाणीटंचाईबाबत सुद्धा चौकस दृष्टीकोन अहिल्याबाईंनी अंगीकारला होता. राज्यकारभार चालवित असताना अनेक ठिकाणी त्यांना पत्रव्यवहार करावा लागत होता. त्या पत्रांचा अभ्यास केल्यानंतर त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व समोर येते. लोककल्याणकारी कार्ये करीत असताना त्यांनी फक्त माळवा प्रदेश समोर ठेवला नाही तर संपूर्ण भारतभर कार्ये पार पाडली आहेत. परधर्मसहिष्णुता दृष्टीकोन समोर ठेवून मशीदी, दर्गे, पीर यांनाही त्यांनी देणग्या दिल्या. गाई-गुरांसाठी कुरणे तयार केली. आपल्या राज्यात जर अधिक पाऊस पडावा वाटत असेल तर वृक्षारोपण हे सक्तीने करावे लागेल असे त्यांचे मत होते. पर्यावरणरक्षणासाठी त्यांनी स्वतंत्र खाते निर्माण केले. त्यांना कलेची जाण होती कलाकारांच्या हाताला काम मिळावे म्हणून अनेक नवनवीन कार्ये त्यांनी हाती घेतली. अहिल्याबाई यांच्यावरील विविध ग्रंथ समजून घेताना वाचकांना प्रेरणा, स्फूर्ती तर मिळेलच त्याबरोबर योग्य असे मार्गदर्शन प्राप्त होते. महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या जडणघडणीत अहिल्याबाईंनी जी विविध आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्ये पार पाडली त्यांचा सकारात्मक परिणाम दिसून येतो. महिला सबलीकरणाचे प्रतीक म्हणून अहिल्याबाईंकडे पाहता येते. अहिल्याबाई जर सती गेल्या असत्या तर समाजासाठी लोकोपयोगी कार्य हातात आले नसते. अहिल्याबाई होळकरांचा स्वाभिमानी बाणा, करारीपणा व मुत्सद्दीपणा व व्यवहारचातुर्य यामुळे कठीण काळातही कणखरपणे त्यांनी लोकहितासाठी कार्य केले. आपल्या सासऱ्यांनी त्यांच्यावर जो विश्वास दाखविला त्याला त्यांनी कधीही तडा जाऊ दिला नाही हे आपण त्यांच्या विविध कार्यातून पाहू शकतो. धवलशुभ्र असे प्रशासन आणि काळंकुट्ट संसार या दोघांमध्ये तिने सुवर्णमध्य साधून यशस्वीपणे योगदान दिले आहे.

**संदर्भ (References)**

1. आपटे द. वि. (संपा १८४२), "चंद्रचूड दप्तर १ली कला : गंगोबा तात्यांची कारकीर्द", प्रकाशक पोतदार, द. वा. मुजुमदार ग. वा., लेखांक १०४ पृ. क्र. ९८.
2. ठाकूर वा. वा. (संपा १९४४), "होळकरशाहीचा इतिहास", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. क्र. १७८-१८५.
3. दीक्षित म. श्री (१९८४), "पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या चरित्रावरील महत्वाचे प्रसंग", इनामदार बंधू प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ३२.

4. पाटील सुलोचना (१९७५), (संपा), “लोककल्याणकारी राज्याची निर्मिती,
5. पुरुषोत्तम (१९१३), “देवी अहिल्याबाई होळकर हिचे सचित्र”, चरित्र प्रकाशक, ए. ए. मोरमकर, पृ. क्र. ३५.
6. महाशब्दे दीपककुमार (१९८२), (संपा), “अहिल्या स्मरणिका खाजगी”, (देवी अहिल्याबाई होळकर, चॅरिटीज ट्रस्ट) इंदूर द्वारा प्रकाशित, पृ. क्र. २४.
7. माने बी. के. (१९९७), “विधायक जीवन मूल्य घडवणारे नेतृत्व: पुण्यश्लोक अहिल्याबाई”, डी. एन. नागर प्रकाशन, अंधेरी, मुंबई, पृ. क्र. १७.
8. लेले सुमती (२००९), “अहिल्याराणी होळकर”, लोकवाङ्मयगृह प्रभादेवी, मुंबई, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. २२.
9. विजया जहागीरदार (१९९५), “कर्मयोगिनी”, मेहता पब्लिशिंग हाऊस, भोपाळ, पृ. क्र. ११३-११४.
10. शास्त्री अवधूत (संपा १९७५), “धर्मभास्कर, देवी अहिल्याबाई होळकर”, विशेषांक, मुंबई, पृ. क्र. ८७.
11. Mohit Bhattacharya (2013), “New Horizons of Public Administration”, Jawahar Publishers & Distributor, New Delhi, P. 178.

**Publisher’s Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*